महाराष्ट्र शासन
(सामान्य प्रशासन विभाग)

**मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी**
**नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**
(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग)

मदता
प्रशिक्षणातून परिवर्तन

www.madta.org.in | prabhodini31paithan@gmail.com | ☎ 02431350605

क्र. ०१/२०२६

दिनांक :- 06/04/2026

## दरपत्रक सूचना

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ही संस्था सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त स्वायत्त प्रशिक्षण संस्था असून छत्रपती संभाजीनगर विभागाची विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेत शासन सेवेतील गट ब आणि गट क संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांना निवासी प्रशासकीय प्रशिक्षण दिले जाते. संस्थेच्या अधिनस्त ०३ इमारती दोन वेगवेगळया परिसरात आहेत. दोन्ही परिसरामधील अंतर अंदाजित ४०० मीटर आहे. दररोज १०० ते १५० प्रशिक्षणार्थी या सेवेचा लाभ घेणार असल्याने संस्थेसाठी ५० Mbps (1:1) Internet Leased Line सेवा घेण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता इच्छुक सेवापुरवठाधारक / फर्मकडून खालील अटी व शर्तीस अधीन राहून स्पर्धात्मक पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

### २) दरपत्रक तपशील

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाचे स्वरुप | ५० Mbps (1:1) Internet Leased Line सेवा पुरविणे |
| २ | करार कालावधी | १ वर्ष |
| ३ | दरपत्रक दाखल करण्याचा कालावधी | दि.०६/०४/२०२६ ते १५/०४/२०२६ कार्यालयीन वेळेमध्ये<br>**अ) सूचना**<br>६. दरपत्रक सीलबंद असणे आवश्यक राहील.<br>७. एकावेळी एकच दरपत्रक सादर करता येईल.<br>८. दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात विहीत मुदतीत प्रशिक्षण संस्थेत सादर करावे.<br>९. विहीत मूदतीनंतर प्राप्त दरपत्रक लिफाफायाचा विचार केला जाणार नाही.<br>१०. दरपत्रकधारकास सेवेच्या संबंधीच्या शंका निवारणासाठी व मार्गदर्शनासाठी संस्थेस कार्यालयीन वेळेत भेट देता येईल.<br>**ब) दरपत्रक पाठविणेकरिता कार्यालयाचा पत्ता**<br>मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ४३११४८ |
| ४ | दरपत्रक लिफाफा उघडण्याचा दिनांक | दि.१६/०४/२०२६ दुपारी १२.०० वाजता<br>(सहभागी सेवापुरवठादार उपस्थित असो किंवा नसो)<br>स्थळ :- प्रशासकीय इमारत, मप्रविप्रप्र, पैठण |

Scanned with OKEN Scanner

## ३) दरपत्रक सादर करण्याची पध्दत BOQ (Bill of Quantity) :-

| Sr. No | Description (A) | Qty | Rate By Service Provider (Rs) (Rate without GST) (B) |
|---|---|---|---|
| 1 | Dedicated Bandwidth 50 Mbps ILL (1:1) Charges (Yearly) | 1 | |
| 2 | Installation Charges (One time) | 1 | |
| 3 | If any other Equipment charges | 1 | |
| | | Total | |

**:: सूचना ::**

१. **सेवापुरवठादाराने सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे -**
   - १. आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट
   - २. आधारकार्ड / पॅनकार्ड
   - ३. GST नोंदणी प्रमाणपत्र
   - ४. तांत्रिक तपशील पत्रक (Compliance Sheet)

२. दरपत्रक सादर करण्यापुर्वी सेवापुरवठाधारकाने संबंधित स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करुनच दर नमूद करावेत.

३. स्तंभ (B) मध्ये नमूद करण्यात येणारे दर GST वगळून सादर करावे.

४. स्तंभ (B) मध्ये नमुद केलेले दराव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम सेवापुरवठाधारकांस देय असणार नाही.

५. उपरोक्त दर नमूद करतांना निविदेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच दर सादर करावेत.

## ४) सेवेच्या अटी व शर्ती :-

१. पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सेवा देणे बंधनकारक राहील.

२. संस्थेमध्ये पुर्णवेळ अखंडीत इंटरनेट सेवा चालू राहील, याबाबतची जबाबदारी संबंधित सेवापुरवठाधारकाची राहील. इंटरनेट सेवा खंडीत झाल्यास त्या कालावधीसाठी देयकातून कपात करण्यात येईल.

३. सदर कामासाठी लागणारा वाहतूक खर्च संबंधित पुरवठाधारक यांचेकडे राहील, त्याबाबत संस्थेकडून वेगळया कोणत्याही देयकाची तरतूद करण्यात येणार नाही.

४. दरपत्रकामध्ये नमूद केलेली सेवा उच्च दर्जाची पुरविणे आवश्यक राहील.

५. देखभाल व दुरुस्ती (on site) आवश्यक असल्यास ती करणे बंधनकारक राहील व त्याचा कालावधी आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाकरिता राहील.

६. या कार्यालयाकडून सूचना मिळल्यानंतर तत्परतेने सेवा देणे बंधनकारक राहील. यामध्ये बेजबाबदारपणा आढळून आल्यास त्याच दिनांकास दरपत्रक करार संपूष्टात आणण्यात येईल.

७. आवश्यकतेनुसार शासकीय सूट्टीच्या दिवशी देखील सेवा देणे बंधनकारक राहील.

## ५) निवड प्रक्रिया :-

५. या कार्यालयामार्फत गठीत करण्यात येणाऱ्या समितीमार्फत दरपत्रकधारकाने सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांची तपासणी करुन पात्रता ठरविण्यात येईल.

६. **निविदा न्युनतम दर ठरविण्यासाठी BOQ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे स्तंभ (B) मधील १ ते २ बाबींसाठी येणाऱ्या एकुण दरांची तुलनात्मक पडताळणी करुन न्युनतम दर (L१) निश्चिती करण्यात येईल.**

७. दरप्रक्रिया प्रक्रिया राबवितांना सहभागी L१ पुरवठाधारकाचे एकसमान दर आल्यास सदर प्रकरणी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.

८. दरपत्रकधारकांना काही तक्रार असल्यास मा. संचालक, मप्रविप्र, पैठण यांचेकडे तक्रार करता येईल. मात्र या प्रकरणी मा. संचालक, मप्रविप्र, पैठण यांचा निर्णय अंतिम असेल.

**सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी/ कोणत्याही कारणास्तव/ कोणत्याही टप्प्यावर/ पुर्णतः किंवा अंशतः रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार या संस्थेने राखून ठेवला आहे.**

**(डॉ. नरेश संगम)**
निबंधक
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर (उ), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner